
Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - V

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - V


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | समीक्षेचा वयापक दृष्टिकोन : संदर्भलक्ष्यी समीक्षा<br>**डॉ. कैलास अंभुरे** | १-११ |
| २ | साहित्यसौंदर्याची तत्वे (सूचकता व व्यामिश्रता)<br>**प्रा. अनुराधा मनोहर मोरे (मधुरा जनार्दन सोनवणे)** | १२-१७ |
| ३ | तौलनिक साहित्य समीक्षेची सैध्दांतिक मांडणी<br>**अरुणा माणिक गायकवाड** | १८-२३ |
| ४ | मार्क्सवादी साहित्य समीक्षा : स्वरुप व आकलन<br>**डॉ. अतुल मधुकरराव देशमुख** | २४-२७ |
| ५ | जनवादी साहित्य समीक्षा<br>**भाग्यशाली लेखराज कांबळे** | २८-३२ |
| ६ | तौलनिक साहित्याभ्यास आणि तौलनिक साहित्यसमीक्षा<br>**डॉ. भरत जाधव** | ३३-४२ |
| ७ | साहित्यसमीक्षेची उद्दिष्टे आणि कार्ये<br>**प्रा. डॉ. सुशील प्रकाश चिमोरे** | ४३-४७ |
| ८ | काव्यात्म साहितय समीक्षा<br>**ज्ञानेश्वर अशोक तिखे** | ४८-५१ |
| ९ | नव्या साहित्य प्रवाहाराच्या शोधातील मराठी समीक्षा<br>**डॉ. प्रदीप औजेकर** | ५२-५६ |
| १० | शरच्चंद्र मुक्तिबोध यांचा मानुषता सिद्धान्त : एक वाचन<br>**डॉ. मनीषा खैरे** | ५७-६३ |
| ११ | समीक्षा संकल्पना आणि मानसशास्त्रीय समीक्षा<br>**प्रा. हरिभजन राम कांबळे** | ६४-६८ |
| १२ | मार्क्सवादी समीक्षा : एक शोध व बोध<br>**डॉ. हरिदास आखरे** | ६९-७१ |
| १३ | ग्रामीण कवितेची समीक्षा : विशेष संदर्भ ''बोलावे ते आम्ही'' या संग्रहातील आधुनिकता<br>**डॉ. जिजा शिंदे** | ७२-७८ |
| १४ | आदिवासी साहित्य समीक्षा : एक दृष्टीकोन<br>**प्रा. नागनाथ करडे** | ७९-८२ |
| १५ | स्त्रीमनात आत्मविश्वास पेरणारी कविता : 'आभाळ अंतरीचे'<br>**प्रा. डॉ. मारोती द. कसाब** | ८३-८८ |




165

# CONTENTS OF MARATHI PART - V


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १६ | शैलीशास्त्रीय समीक्षा : कवी ग्रेस यांच्या कविता<br>**प्रा. डॉ. मधुकर वैकरे** | ८९-९३ |
| १७ | समिक्षा : संकल्पना आणि स्वरुप<br>**प्रा. महारुद्र जगताप** | ९४-९७ |
| १८ | स्त्रीवादी समीक्षा स्वरुप व चिकित्सा<br>**प्रा. मुनेश्वर जमईवार** | ९८-९९ |
| १९ | ग्रामीण कथात्म साहित्य समीक्षा : विशेष संदर्भ ब, बळीचा<br>**कृष्णा उत्तम नागरे** | १००-१०२ |
| २० | ग्रामीण साहित्य समीक्षा<br>**प्रा. पंडित गंगाधरराव रानमाळ** | १०३-१०६ |
| २१ | आदिबंधात्मक साहित्य समीक्षा<br>**ऋता ठाकूर** | १०७-११२ |
| २२ | आदिवासी साहित्य समीक्षा (घारली लोकगीते ; कविता महाराज)<br>**सबाना हमीद तडवी** | ११३-१२१ |
| २३ | दलित साहित्य समीक्षा<br>**प्रा. डॉ. सावंत संभाजी बाबाराव** | १२२-१२४ |
| २४ | आस्वादक साहित्य समीक्षा : एक चिंतन<br>**डॉ. दैवत सावंत** | १२५-१२८ |
| २५ | मानसशास्त्रीय समीक्षा (काही प्रातिनिधक कादंबऱ्यांकडे मनोविश्लेषणाच्या परिप्रेक्ष्यातून दृष्टिक्षेप)<br>**डॉ. सायली योगेश आचार्य** | १२९-१३३ |
| २६ | स्त्रीवादी समीक्षा<br>**प्रा. डॉ. शिल्पा म्हात्रे-काकडे** | १३४-१३८ |
| २७ | लोकसाहित्याची समीक्षा<br>**श्री सिसोदे श्याम धनसिंग** | १३९-१४२ |
| २८ | स्त्रीवादी समीक्षेची समीक्षा<br>**डॉ. सुनंदा घरडे-दुबे** | १४३-१४६ |
| २९ | शास्त्रीय संगीत क्षेत्रातील कलावंतांची मराठी चरित्रे व समीक्षा<br>**शेलोरे मनोज बापुसाहेब** | १४७-१५० |
| ३० | स्त्रीवादी साहित्य समीक्षा<br>**डॉ. शांताराम बबनराव चौधरी** | १५१-१५९ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १७. समिक्षा : संकल्पना आणि स्वरुप

**प्रा. महारुद्र जगताप**
बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रास्ताविक :**

मराठी साहित्यविश्वात समीक्षेला अनन्य साधारण महत्व आहे. मराठीतील 'टीका' व इंग्रजीतील 'क्रिटिसिझम' (Criticism) ला पर्यायी शब्द म्हणून 'समीक्षा' हा शब्द उपयोजिला जातो. तसेच मराठी भाषेत सिंहावलोकन, पुनरावलोकन, परीक्षण, भाष्य अशा समकक्ष संज्ञा वापरल्या जातात. तर इंग्रजी भाषेत समीक्षेस Review (पुनरावलोकन) असा शब्द वापरला जातो. 'समीक्षा' या शब्द प्रयोगात मराठी वाङ्मय व इंग्रजी भाषा यांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. 'क्रिटिसिझम' या शब्दाचे मुळ असणाऱ्या ग्रीक भाषेत चाळणी लावणे, कसोशीने परीक्षण करणे असा अर्थ घेतला जातो. समीक्षा ही अनेक रूपातून अवतारताना आढळून येते. साहित्याला उपकारक ठरणारी समीक्षा ही उपदेशकाच्या किंवा न्यायाधिशाच्या भूमिकेतून केलेली नसते; तर शोधकाच्या जिज्ञासूच्या भूमिकेतून केलेली असते. साहित्यकाने निर्माण केलेली प्रत्येक साहित्यकृती साहित्यविषयक प्रश्न उपस्थित करते. ही साहित्यकृती काय व्यक्त करू पाहत आहे? ती जे व्यक्त करू पाहत आहे ते यथार्थपणे व्यक्त झाले आहे काय? त्याला स्वत:चे रूप गवसले आहे काय? ते व्यक्त होण्याइतके अर्थपूर्ण आहे काय? या प्रश्नांचा समीक्षा शोध घेताना दिसून येते. थोडक्यात समीक्षा ही साहित्यातील सौंदर्यस्थळांचा शोध घेते. अशा या समीक्षा लेखन प्रकाराचा व त्याच्या स्वरूपाचा शोध प्रस्तुत शोध निबंधातून घेतला जाणार आहे.

**समीक्षेची संकल्पना**

'समीक्षा' या शब्दाची सम + ईश अशी निर्मिती झाली आहे. 'सम' म्हणजे सारख्या प्रमाणात आणि 'ईश' म्हणजे पाहणे होय. एखाद्या कलाकृतीची समीक्षा करत असताना समीक्षकाने त्या कलाकृतीकडे सहानुभूतीने, तटस्थपणे, वात्सल्याने, समतोल वृत्तीने आणि सर्वांगीण दृष्टीने पाहणे आवश्यक असते. समीक्षकाने समीक्षा करताना एकांगी दृष्टीकोन बाळगला तर साहित्यास हानी पोहचते. म्हणून समीक्षेत समीक्षकाने कलाकृतीच्या गाभ्यापर्यंत प्रवेश करून रसिकतेने, निरपेक्ष मनाने आणि समतोल वृत्तीने कलाकृतीतील सौंदर्यस्थळे शोधणे महत्वाचे ठरते. पाश्चात्य साहित्य अभ्यासक मॅथ्यू ऑरनॉल्डच्या मतानुसार कवीच्या काव्याचे मूल्य वाचकास प्रतीत करून देणे किंवा साहित्यकृतीती सौंदर्यस्थळे वाचकापर्यंत पोहोचवणे महत्वाचे ठरते. या अर्थाने समीक्षा व्यवहारात 'समीक्षक' वाटाड्याची भूमिका पार पाडताना दिसून येतो. कलाकृतीतील बलस्थाने कोणती आणि उणिवा कोणत्या? हे समीक्षक चांगल्या प्रकारे जाणतो. म्हणून समीक्षकास कलाकृतीतील गुणदोष समजतात.

एखाद्या साहित्य कलाकृतीचा सहानुभूतीपूर्वक, सन्हृदयतेने, वात्सल्याने आस्वाद घेणे, परिचय करून देणे म्हणजेच कलाकृतीच्या गुणदोषांची सहानुभूतीपूर्वक चर्चा करणे होय. समीक्षेसंदर्भात व्याख्या करताना डॉ.रा.शं. वाळींबे म्हणतात की,

"विचार करण्याच्या शास्त्रीय पध्दतीला अनुसरून काही निश्चित तत्वांच्या आधाराने वाङ्मयाचे विवेकपूर्ण विश्लेषण करण्याची जी शक्ती तिला टीका म्हणतात". येथे वाळींबे यांनी समीक्षेतील तत्वांना व विवेकपूर्ण विश्लेषनाला महत्व दिले आहे. तर साहित्य समीक्षक प्रा. रा.ग. जाधव यांनी समीक्षेची व्याख्या करताना म्हटले आहे की, "ललित साहित्याचे आकलन, आस्वादन व मूल्यमापन करण्यासाठी गांभिर्याने होणारा विचार व्यवहार म्हणजे समीक्षा होय". तर डॉ. यशवंत मनोहर यांनी "समीक्षा व्यवहारामध्ये साहित्य निर्माता आणि समीक्षक यांचे कार्य परस्पर पुरक आहे असे म्हटले आहे. साहित्यिक आणि समीक्षक हे दोघेही समाजाच्या मानसिक आरोग्याचे अत्यंत जबाबदार रखवालदार आहेत. ते व्यक्तीच्या मानवी न्यायाचे प्रहरी आहेत. साहित्य म्हणजे मानवी उन्नयनाची जीवन सत्वे! समीक्षक या जीवनसत्वाची आरोग्यवर्धकता तपासतो. त्यात काही भेसळ आहे काय? त्यात काही विघातक आहे काय? ते तपासतो. साहित्यकृतीची अशी तपासणी म्हणजे समीक्षा होय." थोडक्यात समीक्षा म्हणजे भाष्य करणे, निर्णय देणे, परीक्षण करणे, मूल्यमापन करणे, न्याहाळणे, काळजीपूर्वक पाहणे, समग्रपणे पाहणे, चिकित्सा करणे होय. समीक्षा म्हणजे उपदेश नव्हे किंवा पांडित्य प्रदर्शन नव्हे; तर कलाकृतीला सर्वांगीण स्पर्श करणे तिचा एक-एक पदर उलगडून तिच्यातील सौंदर्यस्थळांचा वेध घेणे आणि रसिक वाचकांना तृप्तीचा मार्ग दाखविणे होय.

**समीक्षेचे स्वरूप**

पाश्चात्य विद्येच्या सहवासातून मराठी साहित्यात अनेक लेखन प्रकार उदयास आले. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या लेखक प्रकारा प्रमाणेच समीक्षा लेखनाचा विचार होऊ लागला. ह्या लेखन प्रकारात सामान्यतः पुढील लेखनाचा समावेश केला जातो. यामध्ये साहित्यविषयक प्रश्नाची चर्चा करणारे लेखन व साहित्याच्या संदर्भातील सैध्दांतिक स्वरूपाचे लेखन याचा तात्विक स्वरूपाच्या लेखनात समावेश केला जातो. तर साहित्यकृतीच्या गुणदोषाचे परीक्षण करणारे लेखन हे उपयोजित समीक्षेत मोडते. अर्थात समीक्षेची अशी वर्गवारी केली जात असली तरी त्याची निश्चित व काटेकोर अशी वर्गवारी करता येत नाही. कारण सैध्दांतिक स्वरूपाच्या समीक्षेतही विशिष्ट साहित्यकृती व लेखक यांचे संदर्भ पाहावयास मिळतात. तर उपयोजित समीक्षेत सैध्दांतिक चर्चा लेखकाच्या कलाकृतीचया अनुषंगाने येताना दिसून येते.

आजची 'समीक्षा' ही प्राचीन पौर्वात्य आणि पाश्चिमात्य साहित्य तज्ञांच्या तत्व प्रणालीच्या आधारे निर्माण झाल्याचे दिसून येते. प्राचीन साहित्याचा परामर्श घेताना संस्कृत काव्याचा विचार करावा लागतो. मानवी जीवनाच्या इतिहासात काव्य निर्मिती झाली तेव्हापासून काव्याच्या गुणाविषयी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात चर्चा झाली. चांगले काय? वाईट काय? त्या विषयी चर्चा होताना जिज्ञासा, कुतुहल, आश्चर्य, आदर, स्तुती इत्यादींनी ती प्रेरीत झाल्याचे दिसून येते. या संदर्भात डॉ. रा.शं. वाळिंबे लिहितात, "कवीने काव्य लिहिल्यानंतर ज्ञात्याच्या अभिप्रायाची अपेक्षा करणे ही स्वाभाविक प्रवृत्ती आहे. कालिदासासारख्या कविलाही अभिप्रायाचे वाटणारे महत्व 'शाकुंतल' नाटकाच्या प्रस्तावनेतील श्लोकात स्पष्ट होताना दिसून येते. प्राचीन साहित्य तज्ञांनी काव्यशास्त्रात तत्व प्रणाली प्रणीत केली आहे. 'दंडी' हा काव्यशास्त्राची तात्विक चर्चा करणारा पहिला टीकाकार होय. त्यांचा 'काव्यदर्श' हा प्रबंध त्या दृष्टीने महत्वाचा ठरतो. भरताचे 'नाट्यशास्त्र' प्रामुख्याने नाट्यशास्त्रातील तत्वांचा उहापोह करताना दिसून येते. प्राचीन साहित्य तज्ञांनी प्रामुख्याने रस, गुण, अलंकार, रीती, शैली, शब्द, अर्थ, भाषा,

ध्वनी यांची तत्व प्रणाली सांगितली आहे. भरताने 'नाट्यशास्त्रात' रस विचाराला विश्वनाथाने 'साहित्यदर्पण' मध्ये रसविचाराला, दंडीने 'काव्यादर्श' तून रीती व अलंकाराला, आनंदवर्धनाने 'ध्वन्यालोक' मधून ध्वनीला, क्षेमेंद्राने 'औचित्य विचार' मधून औचित्याला महत्व देऊन काव्यशास्त्र तत्व प्रणालीची चर्चा केलेली आहे. त्यामुळे त्यांची तत्वे टीकाशास्त्रला महत्वाची ठरतात. थोडक्यात प्राचीन टीकालेखनात मतप्रदर्शन, काव्यातील सौंदर्यस्थळांचा निर्देश तसेच प्रामुख्याने शाब्दीक स्पष्टीकरणाचा उद्देश असायचा. ग्रंथकाराच्या एक किंवा समग्र ग्रंथाविषयी, ग्रंथकाराविषयी मत प्रदर्शन, विचार, तुलना इत्यादी गोष्टी फारच क्वचित प्रमाणात पाहावयास मिळतात. थोडक्यात प्रतिभा, चमत्कृती, रस, भाव, अलंकार, गुण, दोष रीती, औचित्य, वक्रोक्ती इत्यादी भारतीय प्राचीन साहित्यशास्त्रातील संकल्पना होय.

मराठी समीक्षा म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो. त्याचा प्रारंभ प्रामुख्याने १९२० नंतर झाला. नववाङ्मय प्रवाह व पध्दतीचा वारसा काव्य सोडल्यास मराठी साहित्याला नसल्यामुळे प्राचीन संस्कृत काव्यशास्त्रावर नवी समीक्षा घडणार नव्हती. म्हणून परकीय प्रेरणेतून साहित्यासोबत साहित्यविचाराचा ना.सि. फडके, वि.स. खांडेकर, अ.ना. देशपांडे, ग.त्र्यं. देशपांडे इत्यादींची परकीय चौकटीतील समीक्षा उदयास आली. या काळातील समीक्षा कलावाद की जीवनवाद या भोवती फिरताना दिसून येते.

१९४५ नंतर मर्ढेकरांच्या समीक्षेने, सौंदर्यशास्त्राने साहित्य व समीक्षेत मुलभूत बदल घडवले त्यांनी दोन्हींच्या मर्यादा सिध्द केल्या असल्या तरी त्यांच्याही काळात जीवनवादी समीक्षा मांडल्याचे दिसून येते. मात्र मार्क्सवादी समीक्षेचा विचार मराठी समीक्षेला अवगत झाल्यानंतर त्यातून पुढे सौंदर्यवादी, कलावादी, शैलीवादी प्रवाह व दुसरा जीवनवादी, मार्क्सवादी, वास्तवादी, समाजशास्त्रीय समीक्षा प्रवाह उदयास आला. मर्ढेकरांच्या काळात पुढे गंगाधर गाडगीळ, वा.ल. कुलकर्णी, मे.पु.रेगे, नरहर कुरूंदकर, प्रभाकर पाध्ये, म.सु. पाटील, सुधीर रसाळ, स.शि. भावे, स.ग. मालशे, अशोक केळकर, माधव आचवल, दि.के. बेडेकर, वि.स. जोग, रा.भा. पाटणकर, दु.का.संत, वसंत दावतर, विद्याधर पुंडलिक, द.भि.कुलकर्णी इत्यादींनी मराठी समीक्षेला विकसीत करण्यात महत्वाची भूमिका पार पाडल्याचे दिसून येते.

१९७० नंतर मराठी समीक्षेत आमुलाग्र बदल झाला. मराठी साहित्य समीक्षेचा विचार करताना ही समीक्षा वेगवेगळ्या अभिधानांनी ओळखली जाऊ लागली. आकलन, आस्वादन, विश्लेषण, संश्लेषण, मूल्यमापन, चर्चा, चिकित्सा, तुलना, न्यायदान, गुणदोष दर्शन, विशदीकरण, टीका, छाया, अनुवाद, मिमांसा, रसग्रहण, समीक्षण, परीक्षण, परामर्ष, अभिप्राय इत्यादी. या समीक्षेचा तात्विक आणि उपयोजित अशा दोन्ही स्तरावरून तिचा संचार होताना दिसून येतो. आज मराठी भाषेतील समीक्षेचा मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे दिसून येते. आधुनिक मराठी समीक्षेच्या वाटचालीत प्रा.गो.म.कुलर्णी, डॉ.यशवंत मनोहर, रा.भा.पाटणकर, डॉ. सदा कऱ्हाडे, डॉ. रा.शं. वाळिंबे, प्रा.रा.ग. जाधव या समीक्षकांनी मौलिक भर घातल्याचे दिसून येते. या काळातील समीक्षेने परकीय सिध्दांताबरोबर भारतीय, महाराष्ट्रीय जीवनवास्तव समोर ठेवले. समीक्षेमध्ये भारतीय तत्वज्ञान, भारतीय परंपरा, भारतीय संस्कृती व भाषा व्यवस्था यांचा वापर व्हायला लागल्याचे जाणवते. एकूणच १९४५ ते १९९० पर्यंतच्या समीक्षाविषयक उपपत्ती, सिध्दांत व संकल्पना विचार पाहिला तर मराठी समीक्षा ही समाजसमीक्षा, सांस्कृतिक समीक्षा बरोबरच

ती वाङ्मय कृतीच्या आकृतीबंधाकडे सजगपणे व खुलेपणाने पाहते आहे. असे दिसून येते. तसेच साहित्य, साहित्यिक, साहित्यकृती या सर्वांचा साकल्याने विचार करून विविध ज्ञानशाखांशी आपला अनुबंध प्रस्थापित करत असल्याचे जाणवते.

संदर्भ ग्रंथ

१) 'मराठी वाङ्मयकोश'- खंड चौथा समीक्षा-संज्ञा, समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००२.

२) 'साहित्य : स्वरूप आणि समीक्षा'- वा.ल. कुलकर्णी.

३) 'साहित्य : समीक्षा आणि संप्रदाय'- प्राचार्य, डॉ. वी.एन. पाटील

४) 'समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप'- डॉ. भास्कर शेळके, प्रा.शशिकांत साळवे.